**संक्षिप्त फौजदारी खटला १२२३/२०२१**
**निशानी ११**

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक १ चा जबाब</u>**

याव्दारे शपथेवर सत्य कथन करतो की
माझे नाव : कैलास नानासाहेब गोरडे,
वय : ५५ वर्षे,
व्यवसाय : शेती,
राहणार : रा. लोणीमावळा, ता.पारनेर जि.अहमदनगर .

**<u>सरकार पक्षाचा सरतपास श्री कुवंरसिंह वळवी यांचे मार्फत सुरु :-</u>**

मी, माझे भाउ, भावजय, माझी पत्नी,माझी मुले असे आंम्ही एकत्र कुटूंबामध्ये राहातो. माझे भाउ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आळकुटी,ता.पारनेर येथे नोकरीस होते. माझे भाउ आळकुटी ते लोणी मावळा असे नोकरी निमित्त रोज ये जा करत होते. माझयाा भावाकडे हिरो होंडा कंपनीची शाईन मोटारसायकल क्रमांक एम एच १६ बी टी ५८३६ ही मोटारसायकल होती. घटना दिनांक २५/८/२०२० रोजी सकाळी ९.३० वाजता घडली होती. त्यादिवशी माझे भाउ आळकुटी येथे शाळे मध्ये गेले होते. त्या दिवशी मी माझया घरीच होतो. त्यावेळी मला सकाळी ११ वाजता डॉक्टर सोपान शेंडकर यांनी फोन करुन सांगितले की माझया भावाला होंडा सिटी कारने मागुन धडक दिल्यामुळे त्याचा अपघात झालेला आहे. त्यानंतर मी व माझे दोन्ही पुतणे आळकुटी येथील डॉक्टर शिरोळे यांच्या दवाखान्यामध्ये गेलो – त्या ठिकाणी डॉक्टरांनी माझया भावाला तपासुन मृत घोषीत केले. त्या नंतर मी पारनेर पोलीस स्टेशन येथे जावुन झालेल्या अपघाताबाबत फिर्याद दिली . आता मला माझी दिनांक २५/०८/२०२० रोजीची फिर्याद दाखवण्यात आली त्याच्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यास **निशाणी १२** देण्यात आली.सदर अपघात हा होंडा सिटी कार चालकाच्या चुकीमुळे झाला होता. फिर्याद दिल्यानंतर मला पोलीसांनी पुन्हा पुरवणी जबाब नोंदवण्याकरिता पोलीस स्टेशनला बोलावले होते. त्यावेळी मला समजले होते की सदर अपघात हा होंडा सिटी कार क्रमांक एम एच ०१ ९६३२ या गाडीच्या धडकेमुळे झाला होता. मला असेही समजले की सदर होंडा सिटी कार ही आरोपी रामा पोकळे हा चालवित होता. आरोपीला पाहिल्यास मी ओळखु शकतो. आरोपी आज रोजी न्यायालयामध्ये हजर आहे.

**सरतपास संपला.**

**<u>आरोपी तर्फे उलटतपास ॲड डी बी मंचरे यांच्यामार्फत सुरुः-</u>**

मी पदवीधारक आहे. मयत हे माझे भाउ होते. हे म्हणणे खरे आहे की सदर अपघात हा मी स्वत: प्रत्यक्ष पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीचे नाव हे मला पोलीसांकडुन समजले होते. हे म्हणणे खरे नाही की आरोपीचे नाव मी दुस-या लोकांच्या सांगण्यावरुन सांगितले आहे. हे मला सांगता येणार नाही की सदर होंडा सिटी कार ही आरोपीच्या मालकीची आहे

किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपी हा बकरे चारवण्यासाठी आळकुटी गावामध्ये गेलेला होता. हे म्हणणे खरे नाही की आरोपीचा सदर अपघाताशी कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की नुकसान भरपाई मिळावी म्हणुन आंम्ही आरोपी विरुध्द खोटी फिर्याद दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की सदर होंडा सिटी कार हा आरोपी चालवित नव्हता. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी मी खोटा जबाब देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवण्णोत्तर स्विकृत,**

**सही/-**
**एस आर कनकदंडे**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,पारनेर**

**दि. १७/०३/२०२६**

**संक्षिप्त फौजदारी खटला १२२३/२०२१**
**निशानी १३**

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक २ चा जबाब</u>**

याव्दारे शपथेवर सत्य कथन करतो की
माझे नाव : किरण शिवाजी शेंडकर ,
वय : ३३ वर्षे,
व्यवसाय : शेती,
राहणार : रा. लोणीमावळा , ता.पारनेर जि.अहमदनगर .

**<u>सरकार पक्षाचा सरतपास श्री कुवंरसिंह वळवी यांचे मार्फत सुरु :-</u>**

पारनेर पोलीसांनी मला आळकुटी रोड येथे बोलावले होते. त्यावेळी माझया सोबत श्रीकर मावळे हा हजर होता. त्यावेळी पोलीसांनी आंम्हाला अपघात झालेले स्थळ दाखविले. त्यानंतर आंम्ही पोलीसांनी लिहिलेल्या एफ आय आर वर सहया केल्या. पोलीसांनी आंम्हाला सदर कागदामधील मजकुर वाचुन दाखविला होता. त्यामध्ये अपघाता बाबत मजकुर नमुद होता. आता मला दिनांक २५/८/२०२० रोजीचा घटनास्थळाचा पंचनामा दाखविण्यात आला. त्याच्यावर अनुक्रमांक १ वर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. **घटनास्थळाच्या पंचनाम्यास निशाणी १४** देण्यात आली.

**सरतपास संपला.**

**<u>आरोपी तर्फे उलटतपास ॲड डी बी मंचरे यांजमार्फत सुरु:-</u>**

हे म्हणणे खरे आहे की मयत साहेबराव गोर्डे हे आमच्या गावचे रहिवाशी होते. पोलीसांनी आंम्हाला पंचनामा करण्याकामी येण्याकरिता लेखी नोटीस दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी पंचनामा हा पुर्वीच लिहुन ठेवला होता. घटनास्थळाचा गट क्रमांक मला निश्चीत सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी आमच्या समक्ष घटनास्थळाचा कुठलाही पंचनामा केलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की मयत व्यक्ती आमच्या गावातील असल्यामुळे मी केवळ पंचनाम्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की आंम्ही पंचनाम्यावर पोलीस स्टेशन येथे सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की पंचनाम्या साठी हजर असल्याबाबत मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी मी खोटा जबाब देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवण्णोत्तर स्विकृत,**
**सही/-**

**दि. १७/०३/२०२६**

**एस आर कनकदंडे**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,पारनेर**